MHAH210003372017

## निशाणी २८ खालील आदेश

(ज्ञानदेव निंबाळकर वि. मोहन निंबाळकर व इतर)

प्रतिवादी १ व ३ यांनी प्रस्तुत अर्ज त्यांना कैफियत देणेकामी झालेला उशिर माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे शेतकरी असून अशिक्षीत असल्याने प्रतिवादींना कोणतेही कायदेशिर ज्ञान नाही. त्यामुळे त्यांना सुमारे ३५ ते ४० वर्षापुर्वीचे जुने ७/१२ उतारे, फेरफार, खरेदीखते व इतर आवश्यक कागदपत्र मुदतीत मिळाले नसल्याने त्यांना कैफियत दाखल करता आली नाही. सबब, त्यांना कैफियत देणेकामी झालेला उशिर माफ होऊन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी विनंती केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास विरोध करुन असे म्हणणे दिले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खरा व बरोबर नसून, प्रतिवादी क्र. ०१ विरुध्द आठ वर्षांपुर्वी व प्रतिवादी क्र. ०३ विरुध्द तिन वर्षांपुर्वी विनाकैफियतचा आदेश झालेला आहे. सबब, खर्चासह अर्ज मंजुर करण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार दाव्यातील विवादाच्या समुळ निराकरणाकरिता योग्य ती संपरिक्षा होणे आवश्यक आहे. त्याकरिता उभय पक्षांचे म्हणणे अभिलेखी असणे आवश्यक आहे. थोडक्यात त्यांना झालेला उशीर माफ करणे न्यायसंगत होणार आहे. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे –

| आदेश | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांनी खर्च रक्कम रुपये ७००/- वादीस देण्याच्या अटीवर त्यांना कैफियत येणेकामी झालेला उशिर माफ करण्यात येतो. |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.02.11 17:27:06 +0530

**( यु. ए. भोसले)**

दिनांक- ०९/०२/२०२६ — दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

ठिकाण - जामखेड — **जामखेड**